# मुंबई मेट्रो-३ साठी ८ डब्यांच्या प्रोटोटाईप ट्रेनचे चार्जिंग सुरू

## पुढील वर्षापर्यंत डेपो तयार करणार

■ मुंबई

**मुंबई** मेट्रो-३ या कुलाबा ते वांद्रे सिप्झ या भुयारी मार्गावर धावणाऱ्या पहिल्या प्रोटोटाईप ट्रेनच्या ८ डब्यांसाठी चार्जिंग आरे येथील सारीपूत नगर येथे सुरू करण्यात आले आहे. आंध्रातील श्रीसीटी येथे हे डबे तयार करण्यात आले असून हे डबे नुकतेच मुंबईत दाखल झाले आहेत. याठिकाणी आता २५ केव्ही इतक्या उच्च दाबाचे चार्जिंग दररोज किंवा कधीही सुरू राहणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने व्यक्त केली आहे.

या प्रोटोटाईप ट्रेनची



चाचणी मरोळ नाका मेट्रो स्थानकापर्यंतच्या मेट्रो-३ च्या बोगद्यातील ३ किलोमीटरच्या पट्ट्यात ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात करण्यात येणार असल्याची शक्यता मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने व्यक्त केली आहे. ही पहिली ८ डब्यांची प्रोटोटाईप ट्रेन बॅटरी ऑपरेटेड रेल्वे कम रोड शंटरने यशस्वीरित्या तयार केली आहे. चार्जिंगचे काम वेगाने सुरू आहे.